# INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 1 | FEBRUARY – 2017


## इंटरपोल (INTERPOLE)


प्रा. डॉ. संजय प्रभाकर ढाके.
सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख , संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग, कै.म.दि. सिसोदे ऊर्फ भाऊसाहेब कला व वाणिज्य महाविद्यालय,नरडाणा ता. शिंदखेडा जि. धुळे .



### Abstract :

इंटरपोल ही जगातील सर्वात मोठी पोलीस सहयोग संघटना/संस्था आहे. हिची स्थापना १९२३ मध्ये झालेली आहे. जगातील १८८ देश तिचे सभासद आहेत. ती आंतरराष्ट्रीय पोलीस सहकार्य वाढीसाठी प्रयत्न करते त्यांचा प्रमुख उद्देश आंतरराष्ट्रीय पातळीवर गुन्हेगारी, दहशतवादी कार्यवाहीचा बीमोड करणे आहे. इंटरपोलचे मुख्यालय फ्रान्समध्ये आहे. ह्या संघटनेच्या अधिकृत भाषा अरबी, इंग्लिश, फ्रेंच, स्पॅनीश, ह्या आहेत.

तिचे कामकाज ७ विभागीय कार्यालयामार्फत चालते. ही कार्यालये अर्जेटीना, कॅमेरुन, कोटे डेलवोरिया, एल सल्वाडोर, केनिया, थायलंड आणि झिम्बाब्वे येथे आहेत. प्रत्येक सभासद देश उच्च प्रशिक्षित अधिकाऱ्यांचा समावेश असलेला राष्ट्रीय केंद्रीय विभाग स्थापन करतात.

एप्रिल १९१४ मध्ये मोनाको येथे पहिली आंतरराष्ट्रीय पोलीस कॉंग्रेस भरविण्यात आली. त्यात १४ देशांनी सहभाग घेतला व आंतरराष्ट्रीय पातळीवर गुन्हेगारांसाठी, संयुक्त कार्यवाही, संयुक्त योजना यांबाबत चर्चा करण्यात आली. पुढे पहिल्या महायुध्दामूळे ही परिषद स्थगित करण्यात आली. दुसऱ्या महायुध्दानंतर म्हणजे १९४६ मध्ये ब्रुसेल्स येथे पोलीसांच्या सहकार्यासाठी दुसरी परिषद भरविण्यात आली. त्यानंतर वरील नियमावली तयार करण्यात आली व मुख्यालय फ्रान्समधील पॅरीस येथे हलविण्यात आले.





### इंटरपोलचा उद्देश (Objectives of Interpole)

इंटरपोलच्या घटनेप्रमाणे कलम-२ अनुसार इंटरपोलचे खालील उद्देश पहावयास मिळतात.

१) आंतरराष्ट्रीय पातळीवर गुन्हेगारी कमी करण्यासाठी प्रयत्न करणे व त्यासाठी एक नियमावली तयार करणे व त्याची काटेकोर अंमलबजावणी करणे.
२) कोणत्याही राष्ट्रांना सहकार्य करतांना त्या राष्ट्रांचे सार्वभौमत्व टिकविण्यासाठी प्रयत्न करणे.
३) सर्व सदस्य राष्ट्रांना समानतेची वागणूक देणे.
४) सर्व कार्यवाही करतांना सहकार्य व मानवी हक्काचे रक्षण करणे.
५) कार्यवाही करतांना शिथिलता बाळगणे.

### नियम आणि शासन (Rules & Govt.)

इंटरपोल त्या त्या देशाच्या राज्यघटनेच्या चौकटीत व मानवी हक्कांना धक्का न लावता काम करते. ती कसल्याही प्रकारचा राजकिय, सैनिकी, धार्मिक, वांशीक, पेचप्रसंगात हस्तक्षेप करत नाही. इंटरपोलचा हेतू आंतरराष्ट्रीय पोलीस सहकार्य वाढीस मदत करणे एवढाच आहे. ती राजनयिक संबंध नसलेल्या देशांमध्येही हे सहकार्य निर्माण व्हावे यासाठी ती प्रयत्न करते.

### आमसभा

इंटरपोलचा सर्वोच्च विभाग म्हणजे आमसभा होय. सर्व सदस्य देश आमसभेचे सभासद असतात. आमसभेची बैठक महत्वाचे निर्णय घेण्यासाठी किंवा ते मंजूर करण्यासाठी वर्षातून एकदा होते. प्रत्येक देशाला एक मतदान करण्याचा अधिकार असतो.

### कार्यकारी समिती


कार्यकारी समिती ही आमसभेने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे काम करते. तसेच ती सरचिटणीसाच्या कामाकडेही लक्ष देते. ही समिती १३ सदस्यीय असते. सदस्य देशातून कार्यकारी समितीचे सदस्य निवडले जातात. कार्यकारी समितीच्या अध्यक्षांचा कार्यकाल ४ वर्षाचा असतो. तीन उपाध्यक्ष असतात व उर्वरीत ९ सदस्य हे तीन वर्षासाठी निवडलेले असतात.

### सरचिटणीस

सरचिटणीस हा इंटरपोलचा प्रमुख व पूर्णवेळ कार्यकारी अधिकारी असतो. तो इंटरपोलचे दैनंदिन कामकाज पाहतो तसेच आमसभा व कार्यकारी समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सरचिटणीसाला निभवावी लागते. त्याचा कार्यकाल ५ वर्षांचा असतो. कार्यकारी समिती त्याचे नांव सूचविते व त्याला किमान २/३ सदस्यांचा पाठींबा आवश्यक असतो.

### भारत आणि इंटरपोल (India and Interpole)

भारत हा देश इंटरपोलचा जुना सदस्य आहे. भारताने सन १९४९ मध्येच इंटरपोलचे सदस्यपद मिळविले आहे. सी.बी.आय.च्या अंतर्गत एक इंटरपोल विंग तयार करण्यात आलेली आहे. भारत इंटरपोलचे कार्यशील सदस्य राष्ट्र आहे. भारताच्या सहकार्यानेच १९८८ मध्ये अंमली पदार्थांवर आंतरविभागीय चर्चासत्र, १९९४ मध्ये आसियन रिजनल कॉन्फरन्स, १९९७ मध्ये जनरल असेब्लींमध्ये आंतरराष्ट्रीय पोलीस व इंटरपोलविषयी चर्चा व सर्व गोष्टी घडवून आणण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर सी.बी.आय. चे बरेचसे अधिकारी हे इंटरपोलशी निगडीत राहून कार्यरत आहेत.




### इंटरपोलची मुख्य कार्ये :

इंटरपोलची चार मुख्य कार्ये आहेत.

#### १) जागतिक पोलीस दळणवळण सेवेचे संरक्षण :

इंटरपोल $1-\frac{24}{7}$ या संकेताने ओळखल्या जाणाऱ्या जागतीक पोलीस दळणवळण सेवेचे संरक्षण करते. त्यामूळे सुरक्षित वातावरणात सदस्य देशांमध्ये पोलीसांना महत्वाच्या असणाऱ्या माहितीचे दळणवळण शक्य होते.

#### २) ऑपरेशनल डाटा सर्व्हिसेस ॲण्ड डाटाबेसेस फॉर पोलीसः

इंटरपोल मोठ्या प्रमाणावर महत्वाची माहिती गोळा करते. उदा. अनेक व्यक्तींची माहिती, हातांचे ठसे, फोटो प्रवासविषयक कागदतपत्रे इत्यादी त्याचबरोबर इंटरपोल महत्वाची गुन्हेगारीविषयक माहिती प्रकाशीतही करते. हा डाटा किंवा माहिती आंतरराष्ट्रीय गुन्हे तसेच अनेक देशांना त्याच्यापूढील गुन्ह्याचा शोध लावण्यासाठी महत्वाची ठरते.

#### ३) पोलीसांना साहाय्यभूत सेवा :

इंटरपोलच्या दृष्टीने सहा महत्वाच्या गुन्ह्यांची क्षेत्रे आहेत.

i) भ्रष्टाचार
ii) मादक पदार्थ व संघटीत गुन्हेगारी
iii) आर्थिक व सायबर गुन्हे

iv) फरारी गुन्हेगार

v)सार्वजनिक सुरक्षितता

vi) दहशतवाद व मानवाची अवैध वाहतूक

इंटरपोल २४ तास चालू असणारे 'आज्ञा व समन्वयक केंद्र' चालवते. त्यामागे सदस्य देशाला संकट परिस्थितीत मदत पुरविणे हा असतो. तसेच त्याद्वारे माहितीची देवाणघेवाण केली जाते. गंभीर घटनांच्या वेळी सदस्य देशांना संकट व्यवस्थापन करण्यास मदत केली जाते.

**४) प्रशिक्षण आणि विकास :**

इंटरपोल सदस्य देशाच्या पोलीसांना प्रशिक्षण देण्यासाठी पुढाकार घेते. मागणीवरुन सल्ला व मदत देते. तसेच गुन्हेगारीविरुद्ध समर्पित होवून लढणारे विभाग/घटक तयार करण्यास पाठींबा देते.

## इंटरपोलची भूमिका व महत्व: (Role and Importance of Interpole)

माहिती तंत्रज्ञानातील क्रांतीमुळे जग एक खेडे बनले आहे. त्यामूळे जागतीकीकरणाची प्रक्रिया तीव्र गतीने जगभर पसरत आहे. परंतु या तंत्रज्ञानात्मक क्रांतीची काळी बाजू म्हणजे याच तंत्रज्ञानाचा आधार घेवून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. विविध क्षेत्रातील गुन्हेगारांचा आलेख हा उत्तरोत्तर त्यामूळे वाढतोच आहे. म्हणजे एका अर्थाने गुन्हेगारी क्षेत्रामध्ये वाढ होत आहे. सायबर गुन्हेगारी, भ्रष्टाचार, दहशतवाद यांनी मानवी अस्तित्वापुढे प्रश्नचिन्ह उभे केले आहे. आण्विक, जैवीक व रासायनिक अस्त्रे दहशतवाद्यांच्या हाती गेली तर अनेक महाभयंकर समस्यांना जगाला तोंड द्यावे लागेल. त्यामूळे संपूर्ण जग एका भितीखाली वावरत आहे. अशा परिस्थितीत सर्व देशातील पोलीसांचा समन्वय साधणाऱ्या संघटनेची आवश्यकता तीव्रतेने समोर येते व त्यातून इंटरपोलचा जन्म झाला आहे.

आजपर्यंत इंटरपोलने महत्वाची कामगिरी पार पाडली आहे. अनेक दहशतवादी वा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गुन्हेगारांची माहिती जमविणे व ती संबंधित देशांना पुरविण्याचे काम इंटरपोलने पार पाडले आहे. अनेक फरारी गुन्हेगारांना पकडून देण्यातही इंटरपोलने महत्वाची भूमिका पार पाडली आहे. त्याचे उदाहरण म्हणजे अनेक वर्षांपासून भारताला हव्या असणाऱ्या कुख्यात अबु सालेमला इंटरपोलने पोर्तुगालमध्ये पकडून भारताच्या स्वाधीन करणे. त्याचप्रमाणे वर उल्लेख केलेल्या आपल्या चौकटीत इंटरपोलने अनेक महत्त्वाची कामे पार पाडली आहेत. त्यामूळे इंटरपोलच्या कामाचे महत्व दिवसेंदिवस वाढते आहे.

## निष्कर्ष (Conclusion):

ही संघटना प्रामुख्याने लोकसुरक्षा, दहशतवाद, संघटीत गुन्हेगारी, मानवताविरोधी गुन्हे, पर्यावरणीय गुन्हे, युध्द गुन्हे, शस्त्रास्त्र तस्करी, अंमली पदार्थ तस्करी, संगणक गुन्हे यावर काम करते. सर्व जगभर ह्या संघटनेचे जाळे पसरले पाहिजे. त्यामुळे वरील स्वरुपातील गुन्हे करणारा गुन्हेगार त्वरीत पकडण्यात येतील. यादृष्टीने जगातील सर्व राष्ट्रांनी संघटना मजबुत होण्यासाठी सकारात्मक पावले उचलली पाहिजेत. तरच जगातील गुन्हेगारांना वचक बसेल व जागतिक सुरक्षा अबाधित राखता येईल.

## संदर्भ (References):

१) खरे विजय,"जागतीक राजकारणात भारत", के सागर पब्लीकेशन्स , पुणे -२०१०.

२) जाधव तुकाराम, "आंतरराष्ट्रीय घडामोडी व भारताचे परराष्ट्र धोरण", युनिक्स ॲकडमी, पुणे, २०१४.

३) घाटे निरंजन,"आधुनिक युध्दसाधने",मेहता पब्लींशींग हाऊस, पुणे- १९९१.

४) विकीपीडया (मुक्तज्ञान कोश)



**प्रा. डॉ. संजय प्रभाकर ढाके.**

**सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख , संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग, कै.म.दि. सिसोदे ऊर्फ भाऊसाहेब कला व वाणिज्य महाविद्यालय,नरडाणा ता. शिंदखेडा जि. धुळे .**